डोंगळा

अनघा हिरे



डोंगळा

अनघा हिरे

ई साहित्य प्रतिष्ठान

डोंगळा (बालकथा)

लेखिका : अनघा हिरे

नाशिक

anagha.hiray@gmail.com

9422284116

प्रकाशक :-ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ मे २०१७

अर्पणपत्रिका

ज्यांना लहान असतांना गोष्टी सांगत सांगत मला लिखाणाचा नाद जुळला त्या माझ्या चिमण्या आदिती ओवीला. . . . . .

डोंगळा

एक होता मुंगळा नाव त्याचे डोंगळा.



आज डोंगळ्याला कसलीशी घाई झाली होती. एरवी रांगेतच फिरणारा डोंगळा आज एकटाच घरभर फिरत होता. आज त्याच्या सोबत एकही मित्र दिसत नव्हता.

असं काय बरं झालं होत कि आज डोंगळ्याला एकटंच फिरण्याची वेळ आली होती.

तर झाले असे कि,

डोंगळा आणि त्याचे मित्र काल संध्याकाळी वडाच्या झाडावरून फिरत होते. वडाच्या झाडावरील फळातील मऊ मऊ गर खाण्यात सर्व मग्न झाले होते. डोंगळ्याला त्याच वेळी एक लालचुटूक वडाचे छोटेशे फळ दिसले आणि त्या फळाच्या



भोवती दहा बारा लाल लाल मुंग्या जमा झाल्या होत्या. मुंग्यांना सुद्धा थोडी न्याहारी करायची होती. डोंगळ्याचे खोडकर मित्र पुढे आले त्यांनी अक्षरशःमुंग्यांना हुसकावून लावले. डोंगळा खूप चिडला. 'अरे आपण सुद्धा खाण्याची मजा करतोय ना! मग त्या बिचाऱ्या छोट्या लाल मुंग्यांना खाऊ द्या कि, हे झाड काय आपल्या एकट्याचे आहे का?'



डोंगळा मित्रांच्या अंगावर जोराचा ओरडलाच. मित्रांना मागे सरकवत तो लाल मुंग्यांच्या दिशेने गेला. आपल्या दिशेने भलामोठा मुंगळा येतोय हे बघून त्या अजूनच घाबरून गेल्या आणि वाट फुटेल तिथे सैरावैरा धावू लागल्या.



‘अगं थांबा, अगं थांबा

मी तुम्हाला काहीही करणार नाही तुम्ही पण खा ही फळं, वाट्टेल तितकी खा. ’

पण . . . .

डोंगळ्याचे बोलणे कुणीच ऐकून घेईना. जीव मुठीत धरून लाल मुंग्या पळत सुटल्या.



लाल मुंग्या आपल्याला घाबरल्या याचे डोंगळ्याला फार वाईट वाटले. त्याला बघून कुणीतरी घाबरून पळालं ही गोष्ट आठवली तरी त्याच मन उदास होऊ लागले कारण डोंगळा स्वभावाने अगदी शांत होता . तो विनाकारण कधीच कुणाला त्रास देत नव्हता कि कुणाला चावतही नव्हता. नेहमीच दुसऱ्याचा विचार करणाऱ्या डोंगळ्याला आज मित्रांमुळे फार दुःख झाले होते.

आज शांत बसायचे नाही. त्या वात्रट मित्रांना आता चांगलेच झापले पाहिजे- असा विचार करून डोंगळा तडक मित्रांकडे निघाला आणि त्याने मित्रांना चांगलेच झाप झाप झापले. डोंगळ्याला मित्रांचा इतका राग आला होता कि आज चक्कपैकी तो त्यांना सोडून एकटाच आपल्या कामाला लागला. आज त्याने एकट्यानेच झाडाची पाने गोळा केली आणि आपल्या नेहेमीच्या ठिकाणी नेऊन ठेवली. भरभर चालत तो एकटाच सर्व काम करत होता. त्याला आज कुणाचीच मदत नको होती. डोंगळ्याला एकट्यालाच काम करतांना बघून त्याचे मित्र जरा खजिल झाले. आपल्या वागण्यामुळे आज आपला चांगला मित्र आपल्यावर रागावला याची सर्वांना समज आली.




कारण शांत मनमिळावू डोंगळा सर्वांनाच हवा हवासा वाटायचा. त्याच्या जोशपूर्ण काम करण्याच्या पद्धतीमुळे तो सर्वांचाच आवडता होता.

डोंगळा शांतपणे आपले काम करतोय परंतु आपल्याशी काहीच बोलत नाही.

मित्रांना राहवले नाही.

सगळे जण डोंगळ्यापाशी जमा झाले आणि त्याच्याशी काहीना काही कारण काढून बोलू लागले. परंतु डोंगळा आपला कुणाशीच बोलायला तयार नव्हता.



आता मित्रांनी ठरवले कि, जाऊन त्या लाल मुंग्यांची माफी मागायची.

ठरल्या प्रमाणे सर्व मुंगळे लाल मुंग्यांपाशी जायला निघाले. मोठ्यासंख्येने आपल्याच दिशेने येणाऱ्या मुंगळयांना बघून लाल मुंग्या परत खूप घाबरल्या वाट मिळेल तिथे पळू लागल्या. परंतु डोंगळ्याच्या मित्रांनी त्यांची वाटच अडवली. "आम्हाला माफ करा , आम्हाला माफ करा"



सगळे मुंगळे एका सुरात ओरडू लागले.

मुंग्यांना आता कुठे सर्व प्रकार लक्षात आला त्यांनी मुंगळ्यांना माफ केले.

परत कधीच त्रास देणार नाही याचे वचनही घेतले.

आता लाल मुंग्या आणि काळे मुंगळे यांची छान मैत्री झाली.

मुंग्यांनी आपल्या नवीन मित्रांना आपल्याकडील काही साखरेचे कण दिले.



मुंग्या आणि मुंगळे साखरेचे कण घेऊन डोंगळ्याकडे आले. आपल्या मित्रांमध्ये झालेला बदल बघून डोंगळ्यालाही फार बरे वाटले. त्याने आपल्या मित्रांना माफ केले.

आता परत एकदा सगळे जण शिस्तीत लाईन करूनच आपली कामे करू लागले.

****

सश्यांचे
शिबीर



सर्व बिळा बिळात मोठ्या सश्या आजोबांनी निरोप पाठवला होता कि, “आज संध्याकाळी आप-आपल्या सर्व पिल्लांना घेऊन वडाच्या झाडाखाली जमावे. ”

वडाच्या झाडाखाली जमायचं ह्या बातमीने सर्व सश्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

घाबरत घाबरतच संध्याकाळी सर्व ससे आपल्या सर्व पिल्लांना घेऊन वडाच्या झाडाखाली जमले.

पांढरे ,करडे, काळे असे अनेक रंगातील सश्यांची पिल्लं जमली.

उंचच उंच फांदीवर बसून ससा आजोबांनी सर्वांना बजावलं कि, “आपल्या सश्यांना सारेच घाबरट समजतात.



आपल्यावरचा हा घाबरट पणाचा शिक्का जर पुसायचा असेल तर सर्वांना धीट होणे गरजेचे आहे, आणि त्या साठीच मी आणि माझे काही मित्र ह्या पिल्लांचे एक शिबीर घेणार आहे.


सर्वानी आप-आपल्या पिल्लांना उद्यापासून शिबिराला पाठवायचे आहे. ”



ठरल्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी सगळे पिल्लं वडाच्या झाडाखाली शिबिरासाठी जमली.

आणि शिबीर सुरु झाले . . . . .

एका ससा आजोबांनी डोंगर चढायचे धडे घेतले तर




दुसऱ्या आजोबांनी उड्या मारण्याचे धडे घेतले. दिवसोंदिवस सर्व बच्चे कंपनी



उड्या मारण्यात आणि धावण्यात तरबेज झाली अंग मेहनितीचे सर्वच कामे मुलांना शिकवले जाऊ लागले.

उरला प्रश्न धीट होण्याच्या बाबतीतला तर मुलांना धीट होण्याची अजिबात इच्छा नव्हती. कारण शिबिरात शिकता शिकता ते स्वतःच्या जीवाला इतके जपत होते कि कुठे खुट्ट आवाज झाला तर लगेचच घाबरून आपापल्या बिळात जात.



मुलांच्या ह्या वागण्यामुळे आजोबा


मात्र फारच चिंतेत होते. मुल धीट व्हावी म्हणून नवीन नवीन युक्त्यांचा विचार करत,

परंतु . . . .

मुलं आपली धाडसी बनतच नव्हती.

एके दिवशी आजोबांनी ठरवले कि आज काहीही झाले तरी मुलांना धीट बनवयाचेच.

म्हणून डोंगर चढता चढता आजोबा मुद्दामच डोंगराच्या खाली पडायला लागले. ते जरा खाली पडून एका झाडाच्या फांदीला पकडून लटकत बसले. सर्व मुलं



घाबरून पुढे झाली. एकमेकांना मदत करत सर्वानी मिळून वेलिचा दोर तयार केला आणि आजोबांना वाचवले.

आजोबांना फार आनंद झाला. चला मुलं आता धीट झाली. आता त्यांच्या अंगातला घाबरटपणा नाहीसा झाला.





खुश होऊन आजोबांनी सर्वांना दोन दोन गाजरे दिली क्षणातच मुलांनी गाजराचा फडशा पाडला. आजोबांनी मुलांना शाबासकी दिली शाबासकी देतांना त्यांनी प्रेमाने मुलांच्या पाठीवर थाप मारली.

बस्स. . . . . . .

मुलांच्या पाठीवर थाप पडताच मुलं घाबरली आणि घाबरून आपल्या बिळात पळत सुटली.



आजोबांना आता कळून चुकले कि आपण कितीही प्रयत्न केला तरी सश्यांमध्ये परिवर्तन घडणार नाही ते भित्रे आहेत आणि भित्रेच रहाणार.

ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

www.esahity.com
esahity@gmail.com